# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



लोकमत पुणे, मंगळवार, दि. 30 जानेवारी २०१८ ७

# सर्वोत्तमाचा ध्यास घ्या : गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क

केसरी पुणे, ३१ जानेवारी २०१८ ३

# सर्वोत्तमाचा ध्यास घ्या : हनुमंतराव गायकवाड



राजगुरुनगर, (वार्ताहर) : आज जागतिकीकरणामुळे ग्राहकाभिमुख बाजारपेठ निर्माण झाली असून जगाच्या रोजगाराच्या संधींचा मागोवा घेऊन तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्तमातून सर्वोत्तमाचा ध्यास घ्या, असे आवाहन भारत विकास ग्रुपचे अध्यक्ष हनुमंतराव गायकवाड यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) एक प्रवास' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक सुशील शिंगवी, सुभाष टाकळकर, ॲड. माणिक पाटोळे, उमेश आगरकर, अंकुश कोळेकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

गायकवाड पुढे म्हणाले, तुमच्या कामाची ताकद मोठी असेल तर वशिल्याची गरज भासत नाही. जिथे काम करता ते नोकरी म्हणून न करता माझं म्हणून करा. कष्टाच्या आयुष्याला एक झळाळी असते आणि घामाला एक सुगंध असतो. त्याबरोबर त्या सुगंधाला या देशाच्या स्वप्नांची जोड असेल तर भारताचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी मीही पुढील १२ वर्षांत १० कोटी लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल करून त्यांना प्रगतीच्या मार्गावर न्यायचा प्रयत्न करणार आहे. भारत विकास ग्रुपचा मागील २० वर्षांत ८ कामगारांपासून ७५ हजार कामगारांमध्ये जो विस्तार झाला त्याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांना आवाहन करताना चांगले करा, यशाचा ध्यास घ्या. तुमच्या कामाने स्वतःला सिद्ध करा. परीक्षेच्या यशापयशाचा आयुष्याच्या यशापयशाशी काहीही संबंध नसतो. तेव्हा उद्याच्या सुंदर दिवसांसाठी प्रचंड कष्ट करून स्वतःला सिद्ध करा, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. टेंडकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केला, तर आभार श्रुतिका कोरडे हिने मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख